## सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सह. साखर कारखाना लि; अमृतनगर

तालुका - संगमनेर, जिल्हा - अहमदनगर

फोन : (०२४२५) २२५३७०, २२५४५७, २२५४९९, तार - संगम साकर (संगमनेर)




जावक नंबर - सभाथोससाका/शेतकी/४४७१/२०१८ दि. २८/०२/२०१८

# परिपत्रक

## सन २०१८-१९ गळीताचे सुरु ऊसासाठी अनुदान योजना

कारखाना कार्यक्षेत्रातील सर्व ऊस उत्पादक शेतकऱ्यांना कळविण्यात येते की, सन २०१८-१९ गळीतासाठी जादा साखर उतारा देणाऱ्या व लवकर पक्व होणाऱ्या ऊसाची सुरु हंगामात जास्तीत जास्त लागवड होण्यासाठी मा. संचालक मंडळाने सुरु ऊस लागवडीकरीता खालीलप्रमाणे अनुदान योजना राबविण्याचे धोरण घेतलेले आहे.

जे ऊस उत्पादक शेतकरी सन २०१८-१९ चे गळीत हंगामाकरीता दि. ०१/०३/२०१८ ते ३०/०४/२०१८ या कालावधीत को. ८६०३२, एमएस. १०००१, व्हीएसआय. ८००५, कोसी. ६७१, को. ४१९, को. ९४०१२ या ऊस जातींची लागवड करतील त्यांना सदरचा ऊस गळीतास आल्यानंतर प्रति मे. टनास १००/- रुपये प्रमाणे अनुदान देण्यात येईल.

तसेच मा. संचालक मंडळाने सन २०१८-१९ हंगामासाठी दि. १ जून २०१७ ते ३० एप्रिल २०१८ या कालावधीचे ऊस पिकास ठिबक सिंचन करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति मे. टन रुपये १००/- जादा दर देण्याचे धोरण घेतलेले आहे.

वरील दोन्ही धोरणांचा विचार केल्यास दि. ०१/०३/२०१८ ते ३०/०४/२०१८ या कालावधीत ठिबक सिंचन करून ऊस लावगड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रति मे. टन २००/- रुपये जादा दर मिळणार आहे.

तरी कारखाना कार्यक्षेत्रातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी वरीलप्रमाणे कालावधीत शिफारस केलेल्या ऊस जातींच्या सुरु ऊसाची जास्तीत जास्त ऊस लागवड करुन अनुदान योजनेचा लाभ घ्यावा. अधिक माहितीसाठी कारखान्याचे गट ऑफिस व शेतकी ऑफिसला संपर्क साधावा हि विनंती.

आपले विश्वासू,

| | | |
|---|---|---|
| जगन्नाथ भाऊराव घुगरकर | भाऊसाहेब दामोधर कुटे | ॲड.माधवराव सावळेराम कानवडे |
| कार्यकारी संचालक | व्हाईस चेअरमन | चेअरमन |

व संचालक मंडळ